# “भूपाळी”

दयाघना श्री स्वामीसमर्था गजानना गुरुवरा ।

कृपाकटाक्षे त्रिताप वारुन रक्षण शिशुचें करा ॥धृ॥

अज्ञानाची रात्र भयंकर चहूंकडे पसरली ।

विषयवासना सटवी टिटवी टी टी करु लागली ॥१ ॥

दिवाभीत हा मत्सर पिंगळा अहंकार साजिरा ।

मनवृक्षावर बसुन अशुभसा काढु लागला स्वरा ॥ २ ॥

नानाविध संकटें चांदण्या चमकाया लागल्या ।

त्यायोगानें सत्पथ वाटा लोपुनी गेल्या भल्या ॥३॥

अरुणोदय तो तुझ्या कृपेचा होऊं दे लवकर ।

चित्त प्राचिला उदय पावुं दे बोधाचा भास्कर ॥४॥

दशेंद्रिये हीं दहा दिशा त्या उजळतील त्यामुळें ।

सत्पथ वाटा दिसूं लागुनी हितानहित तें कळें ॥५ ॥

तुझ्या कृपेचा अगाध महिमा ज्ञाते जन सांगती ।

म्हणुन तुला मी दीनदयाळा येतो काकूळती ॥६ ॥

अंताचा ना मुळीच बघवे वरदकर धरि शिरीं ।

पापताप हें दु:खयातना दासगणूच्या हरी ॥७ ॥

**॥ अनंतकोटी ब्रह्मांडनायक महाराजाधिराज योगीराज परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगांवनिवासी समर्थ सद्गुरु श्रीगजानन महाराज की जय ॥**